१८।५।२

**महाराष्ट्र शासन**
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय (विस्तार), दालन क्र.४२१,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दूरध्वनी - ०२२-२२८४ ३० ८२ ईमेल - registry.sesd-mh@gov.in

क्रमांक : खरेदी-२०२३/प्र.क्र.२३/नोंदणी शाखा दिनांक : ३०ऑगस्ट, २०२३

**प्रति,**

संचालक,
माहिती व तंत्रज्ञान संचालनालय
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२

विषय : **एक ड्युप्लेक्स डिजीटल कॉपीअर मशीन एक वर्षासाठी भाडेतत्वावर पुरविण्यासाठी दरकरार करणेबाबतचे पत्र शासनाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करणेबाबत.**

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग (खुद्द) साठी एक ड्युप्लेक्स डिजीटल कॉपीअर मशीन एक वर्षासाठी भाडेतत्वावर पुरवण्यासाठी खाजगी पुरवठादाराची नेमणूक करण्याच्या अनुषंगाने मागविण्यात येणाऱ्या निविदाचे पत्र शासनाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करणेबाबत आपणांस विनंती करण्यात येत आहे.

वै. ए. डुंबरे

(वैभव डुंबरे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

**सहपत्र :** वरीलप्रमाणे

७३/५७

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
४२१, विस्तार इमारत, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.
दूरध्वनी क्र. : ०२२-२२०२४२३७.

शालेय शिक्षण व क्रीडा विभागातील कार्यालयीन कामकाजाच्या छायांकीत प्रती काढण्यासाठी नामांकीत कंपनीच्या अत्यंत चांगल्या मॉडेलच्या ऑल इन वन सुविधेसह प्रती मिनिट जास्तीत जास्त पाठपोट प्रती देणारी एक नविन ड्युप्लेक्स डिजीटल कॉपीअर मशीन दि.०१ सप्टेंबर, २०२३ ते दि. ३१ ऑगस्ट, २०२४ या १ वर्षाच्या कालावधीसाठी भाडे तत्वावर (देखभाल-दुरुस्तीसह सुटे भाग पुरवठा, पेपर्स, टोनरची शाई आणि यंत्रचालकाच्या सुविधेसह) पुरवठा करण्याबाबत निविदा :-

तांत्रिक निविदा (भाग-अ)

१. निविदाधारकाचे/संस्थेचे नांव :
२. संपूर्ण पत्ता - कार्यालय :
३. दूरध्वनी - (कार्यालय) :
फॅक्स
ई-मेल
४. कॉपीअर मशीनचे मॉडेल क्रमांक/यंत्र क्रमांक :
५. आयकर नोंदणी क्रमांक (पॅन) :
६. GST नोंदणी :
अ)प्रमाणपत्र देणारे कार्यालय :
ब) प्रमाणपत्राचा नोंदणी क्र. व वैधतेची मुदत :

**दिनांक :** **निविदा धारकाचे नांव, स्वाक्षरी व शिक्का**

**स्थळ :**

**सूचना** : दरांमध्ये तसेच निविदा कागदपत्रांत कोठेही खाडाखोड, ओव्हररायटींग (गिरवणे), पांढरी शाई लावणे टाळावे. चुकून तसे करावे लागल्यास पूर्ण स्वाक्षरी करावी. तसे न केल्यास निविदा रद्द करण्याचे अधिकार शासनाने राखून ठेवले आहेत.

९५।५१

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
४२१, विस्तार इमारत, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.
दूरध्वनी क्र. : ०२२-२२०२४२३७.

शालेय शिक्षण व क्रीडा विभागातील कार्यालयीन कामकाजाच्या छायांकीत प्रती काढण्यासाठी नामांकीत कंपनीच्या अत्यंत चांगल्या मॉडेलच्या ऑल इन वन सुविधेसह प्रती मिनिट जास्तीत जास्त पाठपोट प्रती देणारी एक नविन ड्युप्लेक्स डिजीटल कॉपीअर मशीन्स दि.०१ ऑक्टोबर, २०२३ ते दि. ३० सप्टेबर, २०२४ या १ वर्षाच्या कालावधीसाठी भाडे तत्वावर (देखभाल-दुरुस्तीसह सुटे भाग पुरवठा, पेपर्स, टोनरची शाई आणि यंत्रचालकाच्या सुविधेसह) पुरवठा करण्याबाबत निविदा :-

भाग-२ : (अतांत्रिक निविदा) (फॉर्म-ब)
निविदा सूचना

१. नामांकीत कंपनीच्या अत्यंत चांगल्या मॉडेलच्या ऑल इन वन सुविधेसह प्रति मिनिट जास्तीत जास्त पाठपोट प्रती देणारी एक नवीन हेवी ड्युटी (Fast speed) ड्युप्लेक्स डिजीटल कॉपीअर मशीन दिनांक दि.०१ ऑक्टोबर, २०२३ ते दि. ३० सप्टेबर, २०२४ या १ वर्षाच्या कालावधीकरीता भाडे तत्वावर **(मशीन्सच्या देखभाल-दुरुस्तीसह सुटे भाग पुरवठा, पेपर्स, टोनरची शाई आणि यंत्रचालकाच्या सुविधेसह)** पुरविणेचा करार करावा लागेल.
२. **डिजीटल कॉपीअर मशिन्स ह्या संपूर्ण नवीन (New Brand) असाव्यात.** (खरेदी वर्ष, MRP किंमत, मॉडेल क्रमांक व यंत्र क्रमांक, यंत्राच्या सुविधेसह)
३. मशिनच्या छपाईचा दर्जा व कागद सर्वोत्तम व टिकाऊ असणे आवश्यक आहे.
४. मशिनचे मासिक भाडे व त्यामध्ये देण्यात येणाऱ्या प्रतींची संख्या नमूद करावी व किमान प्रतींपेक्षा जादा होणाऱ्या प्रतींचा प्रतीपृष्ठ सवलतीचा दर नमूद करण्यात यावा. दर सर्व करांसह (Including GST) आहे किंवा कसे हे स्पष्टपणे नमूद करावा.
५. विभागातर्फे फक्त मशिन ठेवण्यासाठी जागा आणि वीजेचा पुरवठा करण्यात येईल.
६. मशिनच्या टोनरचा खर्च, दुरुस्तीचा सुट्ट्या भागांसह खर्च व इतर सर्व आवर्ती खर्च पुरवठादाराने करावयाचा आहे. त्याचे प्रदान विभागामार्फत केले जाणार नाही.
७. निविदा फॉर्ममध्ये पुरवठा करण्यात येणाऱ्या प्रतीपृष्ठ (पेपरसह) काढण्यासाठी नमूद करण्यात आलेले दर (सर्व करांसह) हे निविदा स्वीकृतीनंतर एक वर्षासाठी कायम राहतील. तसेच, त्यामध्ये सदर

डिजीटल कॉपीअर मशिनची देखभाल दुरुस्ती, त्यासाठी लागणारे आवश्यक सुट्टे भाग, टोनर इ. सर्व बाबींचा समावेश राहील. तसेच विभागाच्या कामाची गैरसोय न होता, मशिनच्या देखभाल/दुरुस्तीची जबाबदारी पुरवठादाराची राहील. कामाच्या दिवसांमध्ये मशिन बंद असल्यास तेवढ्या दिवसांचे भाडे मासिक सरासरीने कमी करण्यात येईल. विभागातील, अपवादात्मक परिस्थितीत उद्भवणाऱ्या Urgent स्वरुपांच्या कामासाठी (उदा. मंत्रिमंडळ प्रस्ताव, मा. मुख्यमंत्री/मा. उपमुख्यमंत्री/मा. मंत्री/मा.राज्यमंत्री महोदयांकडील तातडीच्या बैठका, न्यायालयीन कामकाज व विधानमंडळ कामकाज इ.) कॉपीअर मशिन ऑपरेटराच्या सेवा कार्यालयीन वेळेपूर्वी तसेच कार्यालयीन वेळेनंतरही उपलब्ध झाल्या पाहीजे. तसेच, अशा परिस्थितीत सेवा उपलब्ध न झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांना या कामापोटी उद्भवलेला खर्च हा पुरवठादारांनी करणे बंधनकारक राहील.

८. कॉपीअर मशिन ऑपरेटरने कार्यालयीन कामकाजाचे दिवशी (सकाळी ०९.३० ते सायंकाळी ०६.३० वाजेपर्यंत) कार्यालयात वेळेवर हजर राहणे अनिवार्य राहील.

९. कार्यालयीन सुट्टीच्या दिवशी आवश्यकतेनुसार सेवा देणे अनिवार्य राहील (कार्यालयीन कामकाजाच्या आदल्या दिवशी त्याची पुर्व कल्पना देण्यात येईल.)

१०. कराराचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर पुढील करार अस्तित्वात येईपर्यंत पुरवठादाराला स्वीकृत दराने डिजीटल कॉपीअर मशिनचा व सेवेचा पुरवठा करणे बंधनकारक राहील.

११. डिजीटल कॉपीअर मशिनवर काढलेल्या प्रतीमहा प्रतींचे देयक संबंधित अधिकारी/ कर्मचाऱ्यांकडून प्रमाणित करुन लगतच्या महिन्यात १० तारखेच्या आत सादर करण्याची जबाबदारी पुरवठादाराची राहील.

१२. कार्यालयीन भाडेतत्वावर मशिन्सचा पुरवठा केल्यानंतर कामाच्या दिवशी मशिनवर काढलेल्या प्रती त्यासंबंधीचे देयके आगाऊ मुद्रांक पावतीसह सादर करावे. देयके प्राप्त झाल्यापासून तीन महिन्यात (९० दिवस) किंवा निधीच्या उपलब्धतेनुसार देयकाची रक्कम ECS प्रणालीद्वारे परस्पर पुरवठादाराच्या खात्यात जमा करण्यात येईल. त्यासाठी कार्यासन अधिकारी, रोख कार्यासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांच्याकडे बँकेच्या खात्याचा तपशील सादर करणे आवश्यक राहील. प्रशासकीय कारणास्तव देयक अदा करण्यास विलंब झाल्यास, विलंब आकार किंवा व्याज देय राहणार नाही.

१३. प्रती पृष्ठ दराचे (Rate per copy) दरपत्रक सोबत जोडलेल्या भाग-१ (तांत्रिक निविदा) आणि भाग-२ (अतांत्रिक निविदा) अशा दोन स्वतंत्र पाकीटात भरुन ती दोन्ही पाकीटे एकाच लिफाफ्यात (Sealed Envelopement) मोहारबंद करुन या विभागातील, **"कक्ष अधिकारी (नोंदणी शाखा), दालन क्रमांक ४५८ (विस्तार), मंत्रालय विस्तार इमारत, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२"** यांचेकडे दि. १२ सप्टेबर, २०२३ पर्यंत कार्यालयीन वेळेत दुपारी ०३.३० वाजेपर्यंत सादर करावीत. त्यानंतर आलेल्या निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

१४. प्राप्त होणाऱ्या निविदा उपसचिव (नोंदणी शाखा), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, दालन क्र. ४३९, चौथा मजला, मंत्रालय विस्तार इमारत, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई - ४०० ०३२

यांचे दालनात दि. १३ सप्टेबर, २०२३ रोजी दुपारी ०३.३० वा. उघडण्यात येतील. निविदा उघडतेवेळी निविदाधारक स्वत: किंवा त्यांचा एक अधिकृत प्रतिनिधी उपस्थित राहू शकेल.

१५.उद्योग संचालनालय किंवा माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाचा दरकरार लागू करण्यात आल्यास त्या दिवसापासून निविदाधारकाबरोबर केलेला दरकरार आपोआप संपुष्टात येईल.

१६.डिजीटल कॉपीअर यंत्राच्या सेवा समाधानकारक न आढळल्यास वा सेवा देण्यास कोणताही विलंब केल्यास करार रद्द करण्याचे संपूर्ण अधिकार विभागास राहतील.

१७. सेवा पुरवठादार संस्था ही नोंदणीकृत असावी.

**दिनांक :** **निविदा धारकाचे नांव, स्वाक्षरी व शिक्का**

**स्थळ :**